**बार्शी येथील ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, ता.बार्शी, जि. सोलापूर यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी दावा क्र. ७०९/२०२४**

**(CNR No. MHSO130008232024)**

शितल काकासाहेब गुंड ..... वादी

विरुध्द

काकासाहेब निवृत्ती गुंड व इतर ..... प्रतिवादी

**निशाणी क्र.५ वरील आदेश**

१. प्रस्तुत अर्ज हा वादीतर्फे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेविरुध्द तात्पुरती मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

**दावा मिळकत -**

२. डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे लाडोळे येथील बागायत शेतजमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे

i) गट नं.३०३/१ क्षेत्र हे. ०५–५८ आर + पो.ख. हे. ०१–७० आर याचा आकार रु. ०७–७८ पैसे पैकी दक्षिण बाजुचे क्षेत्र हे. ०२–०२ आर, याचा आकार रु.०२–७७ पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस – गट नं.३०२, ३०५, दक्षिणेस – गट नं.३०४, ३११, पश्चिमेस – गट नं.२९७, २९२, २९१ व उत्तरेस – गट नं.१९९ व ३००.

ii) गट नं.३०४ क्षेत्र हे. ०२–५६ आर याचा आकार रु.०२–५७ पैसे पैकी दक्षिण बाजुचे क्षेत्र हे. ००–४३ आर, याचा आकार रु.००–५२ पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस – परमेश्वर चाबुकस्वार, दक्षिणेस – सदर गट नंबर पैकी उर्वरित क्षेत्र, पश्चिमेस – कोळेकर यांची जमिन व उत्तरेस – रावसाहेब गुंड यांची जमिन.

Iii) गट नं.३१० क्षेत्र हे. ००–७४ आर + पो.ख. हे. ००–०५ आर, याचा आकार रु.००–८० असे संपूर्ण क्षेत्र तसेच संपूर्ण क्षेत्र असल्याने याची चतुःसिमा दिलेली नाहीत.

iv) गट नं.३११ क्षेत्र हे. ००–०४ आर याचा आकार रु.००–०६ सामाईक क्षेत्रापैकी हे. ००–०२ आर, आकार रु.००–०३ पैसे, असे क्षेत्र तसेच संपूर्ण क्षेत्र असल्याने याची चतुःसिमा दिलेली नाहीत.

सदर दावा कलम १ मधील जमिनीत चालू पाण्याचे सामाईक तीन विहीरी व तीन बोअरवेल. सदर सामाईक तीन विहिर व पाण्यात वादी व प्रतिवादी यांचा सामाईकात १/३

हिस्सा त्यापैकी वादीचा तीन विहिरी व तीन बोअरवेल सामाईकात १/५ हिस्सा यासह आतील झाड झुडूप तदंगभूत वस्तुसह जमीनी.

३. सदर दावा वादीने प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेविरुध्द वाटपाकरिता व निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे.

४. प्रस्तुत अर्ज (नि.क्र.५) वादीने प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दावा मिळकतीबाबत खरेदी, विक्री, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा इ. कोणत्याही प्रकारे मालकी हक्क बदलीचे व्यवहार दाव्याचा निकाल होईपावेतो करु नये असा तुर्तातुर्त ताकिदीचा आदेश प्रतिवादीविरुध्द व्हावा याकरिता दाखल केला होता. तद्नंतर वादीतर्फे प्रतिवादी क्र.३ हिचेविरुध्द सदर अर्ज चालविणेचा नाही अशी पुरसीस (नि.क्र.१६) दाखल करण्यात आली. वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१,२ व ४ यांचेविरुध्द मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र.१, २ व ४ यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल न केल्याने त्यांचेविरुध्द दि.२८/३/२०२५ रोजी म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे.

६. वादीतर्फे नि.क्र.४, १७ लगत दाखल केलेल्या कागदोपत्रांचा आधार घेण्यात आला. प्रतिवादींतर्फे कोणतीही कागदोपत्रे दाखल करण्यात आले नाही.

७. वादीतर्फे विधिज्ञ श्री एन.एन. काझी व प्रतिवादी क्र.१, २ व ४ तर्फे विधिज्ञ श्री आर.एन.गुंड यांचा युक्तिवाद ऐकला.

८. वादातील मुद्दे व त्यावरील निष्कर्ष हे त्यापुढे दर्शविल्याप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नकारार्थी |
| २) | वादी हे सिध्द करतात का की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३) | वादी हे सिध्द करतात का की, प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे ? | नकारार्थी |
| ४) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिता**

९. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी, प्रतिवादी यांचे विरुद्ध तात्पुरत्या मनाई आदेशाची मागणी करीत आहे. सदर अर्ज मंजूर होण्याकरीता वादीस सदर प्रकरणामध्ये प्रथमदर्शनी केस आहे हे शाबीत करणे जरुरीचे आहे. त्याकरीता वादीस दावा मिळकतीमध्ये तिचा हक्क आहे व प्रतिवादी त्यास बेकायदेशीररित्या हरकत अडथळा करीत आहे ही बाब शाबीत करणे जरुरीचे आहे.

१०. वादीतर्फे विधिज्ञांनी युक्तिवाद केला की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे वडीलोपार्जित मिळकती असून एकत्र कुटूंबाच्या मालकीच्या आहेत. वादीने प्रतिवादी यांना तिचा अविभक्त हिस्सा वाटून देणेस विनंती केलेनंतर प्रतिवादी यांनी त्यास नकार दिला. याउलट जमीन विक्री करणार अशी दमदाटी केली आहे. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यात यावा. सदर युक्तिवादाचे पृष्ठयर्थ वादीने मा. कर्नाटक उच्च न्यायालय यांचे ***Mr. Partha Ghorphade V/s. Mr. Indrajit D. Ghorphade, Misc. First Appeal No.**6434/2024 **(CPC)** न्यायनिर्णय दि.१३/१२/२०२४* या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. सदर न्यायनिर्णयाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती व दाखल न्यायनिर्णयातील परिस्थीती भिन्न आहेत. परंतु त्यामधील न्यायीक तत्व सदर प्रकरणास लागू होतो.

११. वादीने दावा मिळकतींचे ७/१२ उतारे (नि.क्र.४/२ ते ४/५) दाखल केले आहेत. सदर ७/१२ उताऱ्यांचे अवलोकन केले असता दावा मिळकतींचे भोगवटदार प्रतिवादी क्र.१ असल्याचे दिसून येते. वादीने फेरफार क्र.१६०१ व ९६३ (नि.क्र.१८/१ ते १८/३) दाखल केले असून त्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ व त्याचे इतर भाऊ व आई यांच्यामध्ये वाटप होऊन प्रतिवादी क्र.१ यास दावा मिळकती हया वाटपामध्ये मिळाल्या आहेत.

वादीचे कथन असे की, सदर मिळकती हया एकत्र कुटूंब मिळकती आहेत. प्रतिवादींतर्फे सदर बाब आव्हानीत करण्यात आली नाही. याउलट बार्शी येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात प्रतिवादी क्र.४ याने दाखल केलेला रे.मु.नं.८९१/२०१६ या दाव्यातील वादपत्र (नि.क्र.४/६) ध्यानात घेता त्यामध्ये प्रतिवादी क्र.४ याने सदर मिळकती या वडीलार्जित मिळकती असलेबाबत कथन केले आहे. तसेच प्रतिवादींतर्फे कैफियत दाखल करुन दावा मिळकती हया एकत्र कुटूंबाचे मालकीच्या आहेत ही बाब नाकारली नाही. अशा परिस्थितीत सद्यस्थितीस अभिलेखावरील उपलब्ध कागदोपत्रांवरुन दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांचे हिंदू एकत्र कुटूंब मालकीच्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर मिळकतीमध्ये वादीचा हक्क असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१२. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, वादीने वादपत्रामध्ये व प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी यांनी वादीस दावा मिळकत विक्री करुन टाकणार आहे अशी दमदाटी केल्याचे कथन केले आहे. परंतु वादीने प्रतिवादी हे दावा मिळकत विक्री करण्याचे तयारीत आहेत ही बाब दर्शविण्याकरिता कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. तसेच प्रतिवादी कोणती मिळकत कोणाला विक्री करणार आहे याबाबत देखील कोणतेही स्पष्ट कथन केले नाही. वादीचे प्रतिवादी दावा मिळकत विक्री करणार आहे हे कथन मोघम स्वरुपाचे आहे.

१३. सदर प्रकरणातील महत्वाची बाब म्हणजे वादीने प्रस्तुत अर्जामध्ये कथन केले आहे की, दावा मिळकती हया प्रतिवादी क्र.१ यांचे नावे एकत्र हिंदु कुटूंब कर्ता म्हणून आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ हे वादी व प्रतिवादी यांचे एकत्र हिंदु कुटूंबाचे कर्ता असल्याचे दिसून येते. उपरोक्त नमूद न्यायनिर्णय ***Partha Ghorphade*** मध्ये मा. उच्च न्यायालय यांनी निरीक्षण नोंदविले आहे की, हिंदू एकत्र कुटूंब कर्ता हा कायदेशीर गरजेपोटी एकत्र कुटूंबाची मिळकत विक्री करु शकतो. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, कायदेशीर तत्वानुसार सहदायक एकत्र कुटूंबाचे कर्ताविरुध्द एकत्र कुटूंबाच्या मालकीच्या मिळकती विक्री करु नये अशाप्रकारचे मनाई मागू शकत नाही. कर्ताने एकत्र कुटूंब मिळकत हस्तांतरीत केल्यास सहदायक सदर हस्तांतरण आव्हानीत करु शकतो. परंतु कर्ताने सदर मिळकती विक्रीच करु नये अशाप्रकारे मनाई कर्ताविरुध्द पारीत करता येणार नाही. तसेच प्रतिवादी क्र.२ व ४ हे देखील दावा मिळकतीतील सहहिस्सेदार आहेत. परंतु दावा मिळकतीचे महसूल अभिलेखावर अद्याप त्याचे नावाची नोंद नाही. वादीतर्फे प्रतिवादी क्र.२ व ४ हे दावा मिळकतीची विक्री करत आहेत हे दर्शविण्याकरिता कोणतेही कागदोपत्रे अथवा इतर साक्षीदारांचे शपथपत्र दाखल

करण्यात आले नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.२ व ४ हे दावा मिळकत विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसून येत नाही.

१४. उपलब्ध कागदोपत्रावरुन दावा मिळकतीमध्ये वादीचा अविभक्त हिस्सा आहे हे दिसून येते. परंतु प्रतिवादी क्र.१, २ व ४ हे बेकायदेशीररित्या दावा मिळकत विक्री करुन वादीची दावा मिळकतीतील अधिकारास हरकत, अडथळा करत आहेत हे दर्शविण्यास वादीस अपयश आले आहे. अशा परिस्थितीत वादीस प्रतिवादी क्र.१, २ व ४ यांचेविरुध्द प्रथमदर्शनी केस आहे हे स्थापित करण्यास अपयश आले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ व ३ करिता –</u>**

१५. वादीचे कथन असे की, प्रतिवादी क्र.१, २ व ४ यांनी दावा मिळकत हस्तांतरीत केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, दावा मिळकतीचे महसूल दप्तरी प्रतिवादी क्र.२ व ४ यांची दावा मिळकतीचे भोगवटदार म्हणून नोंद नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.२ व ४ यांचेकडून दावा मिळकत हस्तांतरण होण्याची शक्यता नाही. प्रतिवादी क्र.१ हा महसूल अभिलेखानुसार दावा मिळकतीचा भोगवटदार असून वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंबाचा कर्ता आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ याचेविरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारीत केल्यास प्रतिवादी क्र.१ याचे कुटूंब कर्ता म्हणून असलेले अधिकारांवरती गदा येणार आहे. उपरोक्त चर्चिलेप्रमाणे अभिलेखावरुन प्रतिवादी हे दावा मिळकती विक्री करण्याचा प्रयत्न करत आहेत असे आढळून येत नाही. अशा परिस्थितीत सदर प्रकरणामध्ये तात्पुरता मनाई आदेश पारीत न केल्यास वादीचे नुकसान होणार नाही. याउलट सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी क्र.१ यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार असून त्यांची गैरसोय होणार आहे. त्यामुळे न्यायाचा तराजू देखील प्रतिवादींचे बाजूने झुकत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिता –</u>**

१६. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीस त्यास प्रतिवादीविरुध्द प्रथमदर्शनी केस स्थापित करण्यास अपयश आले आहे. तसेच तात्पुरता मनाई आदेश पारीत न केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे व न्यायाचा तराजू वादीचे बाजूने झुकत आहे ही बाब शाबीत करण्यास देखील वादीस अपयश आले आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ वरील निष्कर्ष व

त्यावरील कारणमीमांसा ध्यानात घेता वादी तात्पुरता मनाई आदेश हा अनुतोष मिळण्यास पात्र नाही असा निष्कर्ष काढण्यात येतो. त्यामुळे  प्रस्तुत अर्ज नामंजूर करणे उचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

अर्ज (नि.क्र.५) नामंजूर करण्यात आला.

HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Digitally signed by HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Date: 2025.06.16 11:17:05 +0530

**दि.१२/०६/२०२५.** **(श्रीमती ह.उ.उ.पाटील)**

**३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बार्शी**

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y.V. Sital (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. H.U.U. Patil,<br>3rd Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 13/6/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 13/6/2025 |